कार्यालय पोलीस अधिक्षक, गडचिरोली
दिनांक १२/०१/२०१९

# वार्तापत्र

गडचिरोली जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा असुन आदिवासींची स्वतंत्र अशी संस्कृती येथे नांदत आहे. या संस्कृतीला व आदिवासी जनतेच्या अंगामध्ये असलेल्या विविध कला गुणांना प्रोत्साहन देण्याकरीता मा. पोलीस अधिक्षक, श्री शैलेश बलकवडे सा़ो. यांच्या संकल्पनेतुन गडचिरोली जिल्ह्यातील संपुर्ण पोस्टे/उपपोस्टे/पोमके व उपविभाग स्तरावर पारंपारिक रेला समुह नृत्य स्पर्धा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १५ नोव्हेंबर ते दिनांक २० नोव्हेंबर २०१८ दरम्यान सदर रेला नृत्य स्पर्धेला पोलीस स्टेशन स्तरावर सुरवात झाली. सदर स्तरावर जिल्हाभरातून दुर्गम व अतिदुर्गम भागातून ५६० संघानी सहभाग नोंदविला. या स्पर्धेतील सर्वोत्तम ५८ संघाची निवड दिनांक २५ नोव्हेंबर ते दिनांक २६ नोव्हेंबर २०१८ रोजी उपविभागीय स्तरावर होणाऱ्या रेला नृत्य स्पर्धेसाठी करण्यात आली होती. या स्पर्धेत उपविभाग स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणारे १० संघ पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उपविभाग | संघाचे नाव | एकुण स्पर्धक |
|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | डी वायरस ग्रुप चामोर्शि | २६ |
| २ | कुरखेडा | आदिवासी मांदरी ग्रुप बेलगावघाट | ४५ |
| ३ | धानोरा | जय मराई माता नृत्य संघ जेवलवाही | २५ |
| ४ | पेंढरी | कोंदावाही रेला नृत्य संघ | २८ |
| ५ | अहेरी | गोंडवाना जंगम रेला ढेमसा डान्स ग्रुप चौडमपल्ली | १६ |
| ६ | हेडरी | पेठा रेला नृत्य संघ | ३२ |
| ७ | एटापल्ली | बिरसा मुंडा नृत्य कला मंडळ बोलेपल्ली | २० |
| ८ | भामरागड | लाहेरी रेला संघ | ३५ |
| ९ | जिमलगट्टा | रावणराज नृत्य कला संघ येदरंगा | ३६ |
| १० | सिरोंचा | जय सेवा संघ झिंगानुर | २५ |

वरील संघाची जिल्हास्तरीय रेला नृत्य स्पर्धा उदया दिनांक १३/०१/२०१९ रोजी पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर सकाळी १०/०० वा. सुरु होणार असुन या स्पर्धेत अंतिम विजेत्यास प्रथम बक्षिस २५,०००/- रु. व्दितीय बक्षिस २०,०००/- रु. तृतीय बक्षिस १५,०००/- रु. देण्यात येणार असुन या संपुर्ण स्पर्धेसाठी अदयापपर्यंत जिल्हयातील ३० हजार नागरिकांनी प्रतिसाद दिलेला आहे.

तरी जिल्हास्तरावर होणाऱ्या उदयाच्या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त नागरिकांनी सदर स्पर्धेकरिता पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर उपस्थित राहण्याचे आवाहन गडचिरोली पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.